# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.12.2025** **वारःसोमवार**

•विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, पुढील अधिवेशन मुंबईत २३ फेब्रुवारीपासून,

•गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, आणि सिंचनासह विविध क्षेत्रात राज्यानं भरीव काम केल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन,

•अधिवेशनातून शेतकऱ्यांना आणि विदर्भातील जनतेला काहीही मिळालं नसल्याची विरोधकांची टीका,

•आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या हस्ते मुंबईत प्रोजेक्ट महादेवचा प्रारंभ,

आणि

•धरमशाला इथं वीस षटकांच्या क्रिकेट सामन्यात भारताचा दक्षिण आफ्रिकेवर सात गडी राखून विजय.

**<u>अधिवेशन</u>**

राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन काल संस्थगित करण्यात आलं. विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या २३ फेब्रु वारी पासून मुंबईत होईल, अशी घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. हिवाळी अधिवेशनात विधानसभेत एकंदर १८ विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली आणि त्यातली १६ मंजूर झाली, तर विधानपरिषदेत ४ विधेयकं संमत झाली.

**<u>मुख्यमंत्री</u>**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आजही देशातील सर्वाधिक सक्षम आणि स्थिर अर्थव्यवस्था असून कर्ज, राजकोषीय तूट, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, सिंचन, वीज, दळणवळण आणि कायदा-सुव्यवस्थेसह प्रत्येक क्षेत्रात राज्यानं भरीव काम केलं असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना सांगितलं. राज्याची अमृत महोत्सवाकडं वाटचाल सुरू असताना पुढचा काळ महाराष्ट्रासाठी अत्यंत निर्णायक

असल्याचं नमूद करून मुख्यमंत्र्यांनी सभागृहातील सर्व नेत्यांना एकत्र येऊन रचनात्मक कार्यातून राज्याला वेगानं पुढं नेण्याचं आवाहन केलं.

भारतीय रिझर्व्ह बँकेनं घालून दिलेल्या मर्यादेच्या आतच राज्य सरकारनं कर्ज घेतलं असून राजकोषीय तूट तीन टक्क्यांच्या आत ठेवण्यात  यश आलं असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांसंदर्भात त्यांनी माहिती दिली, ते म्हणाले..

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत अंतिम आठवडा चर्चेला उत्तर दिलं. "सर्वांसाठी घरे" या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी आणि मुंबईकरांचे घराचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारनं अनेक क्रांतिकारी निर्णय घेतल्याचं ते म्हणाले. अतिवृष्टीमुळं नुकसान झालेल्या १ कोटी १३ लाख शेतकऱ्यांपैकी ९१ लाख १० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात १५ हजार कोटींची मदत जमा झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, या अधिवेशनातून शेतकऱ्यांना आणि विदर्भातील जनतेला काहीही मिळालं  नसल्याची टीका विरोधी पक्षानं अधिवेशनानंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत केली. सरकारकडून झालेल्या घोषणा केवळ मुंबई, ठाणे, नवी मुंबईसाठी असून विदर्भासाठी एकही घोषणा करण्यात आली नाही, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव यांनी म्हंटलं. विरोधी पक्षानं कायदा सुव्यवस्थेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर ठोस उत्तर मिळालं नसल्याची टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी केली. हे अधिवेशन केवळ पुरवणी मागण्या मान्य करण्यासाठी होतं, असंही ते म्हणाले. तर अधिवेशनात विदर्भासाठी कोणताही ठोस निर्णय घेतला गेला नसल्याचं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले....

**<u>मुख्यमंत्री-पुणे</u>**

पुण्यातील विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**भाजपा-अध्यक्ष**

भाजपच्या कार्यकारी अध्यक्षपदी बिहारचे नितीन नबीन यांची निवड झाली आहे.  भाजपाच्या संसदीय मंडळानं ही नियुक्ती केल्याचं पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुण

सिंग यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. नितीन नबीन सध्या बिहार मंत्रिमंडळात मंत्री असून ते जे पी नड्डा यांच्याकडून अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारतील. पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजप नेते नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांचं अभिनंदन केलं आहे.

**पुस्तकमहोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसातच दीड लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी गर्दी केली आणि या दोन दिवसांच्या पुस्तक खरेदी- विक्रीतून काही कोटींची उलाढाल झाल्याची माहिती महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी दिली आहे.

दरम्यान, या पुस्तक महोत्सवात बालमहोत्सव, खाद्य महोत्सवाबरोबरच काही जनजागृतीपर उपक्रम घेतले जात आहेत. पुणे सायबर पोलिसांच्या बालिका बिटले, सुनयना मोरे आणि रोहिणी कर्डुले यांनी काल सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली. यावेळी बोलताना बालिका बिटले म्हणाल्या..

**सवाईगंधर्व**

शास्त्रीय संगीत रसिकांची स्वरपंढरी मानल्या जाणाऱ्या 71व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची काल पुण्यात सांगता झाली. गेल्या पाच दिवसांपासून महाराष्ट्रीय मंडळाच्या मैदानावर रंगलेल्या या स्वरांच्या महोत्सवात शास्त्रीय संगीत क्षेत्रातील दिग्गज कलाकारांबरोबरच नवोदित कलाकारांनीही आपल्या कलेचं सादरीकरण केलं आणि त्याला रसिकांनी भरभरून दाद दिली.

**महादेवा-मेस्सी**

राज्यातल्या १३ वर्षांखालील फुटबॉलपटूंना जागतिक दर्जाचं प्रशिक्षण आणि शिष्यवृत्ती देण्याच्या उद्देशानं सुरू करण्यात आलेल्या प्रोजेक्ट महादेव या योजनेचा प्रारंभ काल आंतरराष्ट्रीय फूटबॉलपटू लिओनेल मेस्सी आणि

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या या कार्यक्रमाला क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, फुटबॉलपटू सुनील छेत्री, अभिनेता टायगर श्रॉफ यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. २०३४च्या फुटबॉल विश्वचषकासाठी 'प्रोजेक्ट महादेवा' मधून गुणवान खेळाडू मिळतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान काल धरमशाला इथं झालेल्या मर्यादित २० षटकांच्या क्रिकेट सामन्यांत भारताने दक्षिण आफ्रिकेवर सात गडी राखून विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या ११८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने १५ षटकं आणि ५ चेंडूत तीन बाद १२० धावा केल्या. अभिषेक शर्माने सर्वाधिक ३५ आणि तिलक वर्माने नाबाद २५ धावा केल्या. तत्पूर्वी, भारताने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघाने निर्धारित २० षटकांत ११७ धावा केल्या. कर्णधार एडेन मार्करामने सर्वाधिक ६१ धावा केल्या. भारताकडून अर्शदीप सिंग, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. या विजयासह, भारतीय संघ पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ असा आघाडीवर आहे. मालिकेतील चौथा सामना बुधवारी लखनौमध्ये खेळला जाईल.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या अनेक भागांमध्ये थंडीचा कडाका कायम असून आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.